मनुष्याने केलेल्या परिश्रमाचं खरं बक्षीस त्याला काय मिळालं हे नसून त्या परिश्रमाने तो काय बनला हे आहे.
-- जॉन रस्किन.

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२५ नोव्हेंबर २०२४

## भाजपाच्या रेकॉर्डब्रेक जागा, महायुतीला बहुमत !




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खालल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेसाठी कंबर कसली होती. लोकसभेच्या पराभवानंतर देवेंद्र फडणवीसांनी जबाबदारीतून मुक्तीसाठी मागणी केली होती. परंतु, पक्षश्रेष्ठींनी ही मागणी मान्य न करता विधानसभेसाठी पुन्हा त्यांनाच संधी दिली. त्यांनी या संधीचं सोनं केलं असून भाजपासह महायुतीतील सर्वच घटकपक्षांच्या जास्त मताधिक्याने जागा आणल्या आहेत. दरम्यान, देवेंद्र फडणवीसांनी आता मतदार, कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. त्यांनी यासंदर्भात आज एक्सवर पोस्ट केली. महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीला मिळालेला महाविजय फक्त भाजपा-महायुतीचा नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या विश्वासाचा आहे. तुम्ही दाखवलेल्या या विश्वासासाठी आणि दिलेल्या प्रेमाबद्दल महाराष्ट्राच्या जनतेपुढे मी नतमस्तक होतो, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, मित्रमंडळी आणि माझा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता ज्यांनी गेले काही दिवस जिवाचे रान करून वेळ-काळ न पाहता मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला, अशा सर्वांचा मी कायम ऋणी राहीन!, असं फडणवीस म्हणाले.

आपणा सर्वांच्या पाठिंब्यामुळेच महायुतीला मिळालेल्या या विजयाने एक नवीन दिशा दिली आहे. हे यश आपल्या महाराष्ट्राला एक प्रगतीशील आणि सर्वसमावेशक भवितव्यासोबत मोदींच्या नेतृत्वात विकसित भारतासह विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रेरणा देत राहील. पुन्हा एकदा आपले मनःपूर्वक आभार. आपला विश्वास आणि प्रेम सदैव राहो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना, असं म्हणत त्यांनी सर्वांचे आभार मानले.

**विधानसभा निवडणुकीसाठी रणनीती**

लोकसभेनंतर लगेचच विधानसभेच्या निवडणुका झाल्या असत्या तर त्याचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता होती. त्यामुळे फडणवीस यांनी पराभवाच्या कारणांचा शोध घेत त्यावर उपाययोजना सुरू केल्या. शिवाय कार्यकर्त्यांचे मनोबल खचू नये म्हणून त्यांच्यात पुढची निवडणूक आपणच जिंकणार असा विश्वास निर्माण केला. प्रचारासाठी बुथनिहाय नियोजन करण्यात आले. उमेदवारी वाटप करताना सर्व समाजघटकांचा विचार करण्यात आला. 'लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीचा लाभ निवडणुकीत व्हावा हे चाणाक्षपणे पाहण्यात आले. या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून भाजपसह महायुतीतील घटक पक्षांनाही मिळाले.

## या आठवड्यात कोणत्या फळभाज्या झाल्या महाग ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, पुणे :** श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली.

कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १० ते १२ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून ३ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ ते ३ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ६ ते ७ टेम्पो गाजर, गुजरातमधून ५० टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो सात ते आठ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, पुरंदर, पारनेर, वाई, सातारा परिसरातून मटार ४० ते ५० गोणी, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, भुईमूग शेंग ४० ते ५० गोणी, कांदा ७० ते ८० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० ते ४५ टेम्पो बटाट्याची आवक झाली.

**कोथिंबीर, मेथी, शेपू, कांदापात, करडईच्या दरात वाढ -**

गेल्या आठवड्याच्या तुलनेत कोथिंबीर, मेथी, शेपू, कांदापात, करडई, अंबाडी, मुळा, चुका, चवळई, पालक या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे.चाकवत, पुदिना, राजगिरा या पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबीर एक लाख जुडी, तसेच मेथीच्या ४० हजार जुडींची आवक झाली. किरकोळ बाजारात कोथिंबिरेच्या एका जुडीची विक्री २० ते ३० रुपये दराने केली जात आहे. मेथीच्या एका जुडीची विक्री ४० रुपयांना केली जात आहे. बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे – कोथिंबीर- १५०० ते २०००, मेथी – २५०० ते ३०००, शेपू – १५०० ते २०००, कांदापात- १५०० ते २०००, चाकवत – ५०० ते ८००, करडई- ५०० ते ८००, पुदिना – ५०० ते १०००, अंबाडी – ५०० ते ८००, मुळे – १२०० ते २०००, राजगिरा- ५०० ते ८००, चुका – ५०० ते १०००, चवळई- ५००-८००, पालक- १२००-२०००.

**चिकू, पेरू, पपईच्या दरात वाढ -**

चिकू, पेरु, पपईच्या दरात वाढ झाली आहे. लिंबांच्या दरात घट झाली आहे. कलिंगड, खरबूज, सीताफळ, अननस, मोसंबी, संत्री, डाळिंब, बोरांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी मोसंबी ४५ ते ५० टन, संत्री ४० ते ५० टन, डाळिंब ६० ते ७० टन, पपई १० ते १५ टेम्पो, लिंबे दोन ते तीन हजार गोणी, कलिंगड २ ते ३ टेम्पो, खरबूज १ ते २ टेम्पो, चिकू २०० गोणी, पेरू ६०० ते ७०० प्लास्टिक जाळी (क्रेट), बोरे ८०० गोणी, सीताफळ ३० ते ३५ टन अशी आवक झाली.




## कमी बससंख्येमुळे पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांचा खोळंब



**नाशिक :** राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने प्रवाशांच्या सेवेसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असताना काही ठिकाणी मात्र बससेवा विस्कळीत होत आहे. नाशिक-पुणे बससेवा यापैकी एक. रविवारी सायंकाळी एक तासापेक्षा अधिक वेळ थांबूनही पुण्याला जाण्यासाठी प्रवाशांचा खोळंबा कायम होता. राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने नाशिक-धुळे, नाशिक-बोरिवली, नाशिक-पुणे या मार्गांवर बसच्या फेऱ्या अधिक राहतात. विशेषत: नाशिक-पुणे ही बससेवा सातत्याने सुरू राहते. शनिवार-रविवार या आठवड्याच्या शेवटच्या दोन दिवसांमुळे, मतदान तसेच अन्य काही कारणांमुळे रविवारी मेळा बस स्थानकात पुण्याला जाण्यासाठी प्रवाशांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. परंतु, प्रवाशांच्या तुलनेत बसची संख्या तसेच फेऱ्या कमी होत्या. स्थानकात काही बस उपलब्ध असताही त्या फेरीसाठी सोडल्या जात नव्हत्या.

## महाबळेश्वर येथे मकरंद पाटील यांच्या विजयाचा जल्लोष



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२४, महाबळेश्वर :** २५६ वाई-खंडाळा-महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस महायुतीचे उमेदवार जननायक आमदार मकरंद (आबा) पाटील यांनी आपल्या विरोधी पक्षाच्या उमेदवार अरुणादेवी पिसाळ यांचा तब्बल ६१३९२ मतांनी पराभव केला. तसेच सलग ४ वेळा विजय संपादन करून विजयी चौकार मारला. यावेळी महाबळेश्वर शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत विजय रॅलीचे आयोजन केले. कल्पना हॉटेल येथून रॅलीस सुरुवात झाली. यामध्ये महायुतीचे घटक पक्ष भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते एकत्र येऊन मुख्य बाजारपेठ मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत रॅलीमध्ये सहभागी झाले होते. सदरच्या विजयी मिरवणुकी मध्ये किसन शिंदे, अफजल भाई सुतार, प्रकाश पाटील, सुनील शिंदे, रविंद्र कुंभारदरे, विशाल तोष्णीवाल, समीर सुतार, सतिश ओंबळे, संजय पिसाळ, आबा शिंदे, विजय नायडू, संजय जंगम, अनिल साळुंखे, फकिर वलगे, तौफिक पटवेकर, प्रभाकर देवकर, किरण शिंदे, राजेंद्र पवार, विजय बिरामणे, विमलताई पारटे, उषाताई ओंबळे, श्रध्दा रोकडे, वनिता जाधव, वर्षा आरडे, मेघा चौरगे, ज्योती वागदरे, भक्ती जाधव, सुरेखा पंडित, सुनिता फळणे, सोनाली बांदल, प्रभा नायडू, शिवानी वाडकर, संजय ओंबळे, रोहित ढेबे, सचिन गुजर, सुनील ढेबे, विनय गायकवाड, पत्रकार राहुल शेलार, रियाज मुजावर, अजित कुंभारदरे, राजेश सोंडकर, मिलिंद काळे तसेच मोठया प्रमाणात महिला वर्ग व जनसमुदाय उपस्थित होता.

## मनसेचे प्रमोद गांधी यांनी मानले मतदारांचे आभार



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, गुहागर :** प्रतिष्ठेची ठरलेली २६४ गुहागर विधानसभा निवडणुकीत मनसेचे उमेदवार प्रमोद गांधी यांचा पराभव झाला. मनसेला अपेक्षित असं यश प्राप्त न झाल्याने, मनसे कार्यकर्ते, पदाधिकारी यांना हा पराभव फार जिव्हारी लागला. प्रमोद गांधी यांनी जनतेने दिलेला कौल याचा आदर करत रविवार, दि.२४ नोव्हेंबर २०२४ रोजी चिखली येथील ओमकार मंगल कार्यालय येथे आभार सभेचे आयोजन केले होते. प्रथम समस्त मतदान जनतेचे आभार मानत सदर सभेत निवडणूक प्रक्रियेत सहकार्य व अहोरात्र मेहनत करणाऱ्या मनसे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी, प्रशासकीय यंत्रणा, पत्रकार, हस्ते पर हस्ते सहकार्य करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे आभार व्यक्त केले आहेत. सभेला गुहागर तालुका मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविकास आघाडी आणि महायुती समोर आम्ही स्वबळावर लढलो हाच आमचा विजय आहे. आम्ही हरलो ही यशाची पहिली पायरी आहे. लोकसभेचे उमेदवार विजयी झाल्यानंतर आभार मानने सोडाच पण गुहागर मतदारसंघात फिरकलेच नाही. जनतेने दिलेला कौल हा आम्ही सार्वभौम मानतो. झालेल्या पराभवाचा चिंतन करून मनसे सैनिक तेवढ्याच ताकदीने पुन्हा सामान्यांसाठी लढेल.

**- मनसे उपजिल्हाध्यक्ष, विनोद जानवळकर**

## आ.काशिनाथ दाते सरांनी घेतले अण्णा हजारे यांचे आशीर्वाद



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातून विजयी झाल्यावर नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते सरांनी पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांची राळेगणसिद्धी येथे भेट देऊन आशिर्वाद घेतले. आमदार काशिनाथ दाते यांनी विजयी सभेनंतर व निवडणूक प्रमाणपत्र घेतल्यानंतर थेट राळेगणसिद्धी गाठली व तेथे आण्णा हजारे यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी आण्णासाहेब हजारे यांनी जुन्या आठवणी सांगितल्या की पूर्वी पारनेरला एकच दाते सरांचे टायपिंग होते. तेथून पत्र इतर टायपिंग करून घेत असायचो. सरांची इच्छा होती आमदार होण्याची शेवटी ती इच्छा पूर्ण झाली. आता तालुक्यातील विकास कामे करा जनतेची सेवा करा. आचार विचार शुद्ध ठेवा आणि कामे करत रहा. अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, दत्ता आवारी, सुरेश पठारे,लाभेश औटी, सरपंच कांडेकर, नानाभाऊ मापारी, किसन मापारी, रामदास सातकर यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अक्षराज

२ बुलडाणा, सोमवार, दि.२५ नोव्हेंबर २०२४ विविधा

## संपादकीय



### महाराष्ट्राचे भाग्यविधाते

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी. आजच्याच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए – एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हमात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.

**यशवंतराव चव्हाण यांना भावपूर्ण आदरांजली.**

# दिल्लीश्वरांचा वंडरबॉय : देवेंद्र फडणवीस

क्रिकेट प्रमाणेच राजकारण, सत्ताकारण हा अनिश्चिततेचा खेळ आहे, सापशिडी प्रमाणे कोण अचानक वर जाईल आणि वरून खाली येईल याचा अंदाजच बांधता येत नाही, राजकारणात अनेकांना संधी मिळते मात्र त्याचे सोने करणे सगळ्यांनाच जमते असे नाही,

अनेकांना राजकीय पार्श्वभूमी नसली तरी संधी मिळते काहींना घराणेशाहीच्या वारसाहक्काने संधी मिळते मात्र आपले कर्तृत्व सिद्ध करावेच लागते. शुन्यातुन यश मिळविणाऱ्या भाजपने दोन खासदारांपासुन मजल मारली आणि स्वबळावर तीनशे तीन खासदार निवडून आणण्यापर्यंत तसेच अनेक राज्यांत सत्ता मिळवली. गेल्या दहा वर्षांपासून तर भाजप केंद्रीतच राजकारण आणि सत्ताकारणा झाले आहे. कालांतराने देशात कै. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए चे सरकार बनले तर राज्यात १९७८ साली शरद पवार यांनी पुलोद चा प्रयोग करून सत्ता स्थापन केली तेव्हा पहिल्यांदा भाजपला सत्तापदे मिळाली नंतर भाजप शिवसेनेचे १९९५ साली सरकार बनले. तेव्हा देवेंद्र फडणवीस हे कुठेच नव्हते, एकनाथ खडसे,कै. प्रमोद महाजन, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशी भाजपचे नेतेमंडळी होती. मात्र देवेंद्र फडणवीस यांची राजकीय सुरवात झाली ती नागपूर मधुन नगरसेवक नागपुरचे महापौर अशी एक एक पायरी चढत फडणवीस राजकीय यश मिळवत १९९९ मधे पहिल्यांदा आमदार झाले आणि सलग ते आमदार म्हणून निवडून येत आहे. २०१४ साली देशात सत्तांतर झाले आणि मोदी यांनी पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली, तर त्याच वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आणि अगदी अनपेक्षितपणे देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली. शरद पवार( ३८)यांच्या नंतर अगदी तरुण वयात (४४) वर्षी ते राज्याचे मुख्यमंत्री बनले. त्यावेळी' देशात नरेंद्र राज्यात देवेंद्र' हे सुत्रे चांगलेच गाजले. देवेंद्र फडणवीस हे दिल्लीश्वरांचे वंडरबॉय अशी त्यांची ओळख निर्माण झाली. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात त्यांनी अनेक यशाची शिखरे गाठली.

बहुमत नसतांना आणि शिवसेनेबरोबर युती नसताना त्यांनी सरकार स्थापन केले, त्यांना छुपी मदत मिळाली ती राष्ट्रवादी पक्षाची. तर ऐकनाथ शिंदे हे विरोधी पक्षनेते बनले मात्र अल्पावधीतच शिवसेना सरकार मधे सामील झाली, तुझे माझे जमेना तुझ्या वाचून करमेना अशा पद्धतीने फडणवीस सरकार ची पाच वर्षे पूर्ण झाली या काळात खुद्द ऐकनाथ शिंदे यांनी वैतागून राजीनामा दिला होता आणि शिवसेनेचे सगळे मंत्री खिशात राजीनामे घेऊन फिरत होते, त्याच बरोबर पक्षांतर्गत विरोधक समजले जाणारे ऐकनाथ खडसे, विनोद तावडे, पंकजा मुंडे यांच्या महत्त्वाकांक्षेला व्यवस्थित हाताळले. ऐकनाथ खडसे यांना तर आयुष्यभर ज्या पक्षासाठी आपले आयुष्य खर्ची केले त्या भाजपला सोडचिठ्ठी द्यावी लागली आणि याचा दोष ते ऊघडपणे देवेंद्र फडणवीस यांना देतात,असे असले तरी एक ऊत्तम प्रशासक म्हणून त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले.

२०१९ साली भाजप – शिवसेनेची युती होती, निवडणुकीत युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते मात्र अनपेक्षितपणे बंद दरवाजा आड दिलेल्या शब्दावरून दोघांत बिनसले आणि या संधीचा फायदा घेत जाणत्या राजांनी वेगळाच राजकीय डाव मांडला, अनपेक्षितपणे शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस या तीन पक्षांची 'मविआ' आघाडी बनली आणि ऊद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले. मावळत्या विधानसभेत भाषण करतांना देवेंद्र फडणवीस यांनी 'मी पुन्हा येईन'



चा त्रिवार ऊच्चार केला मात्र त्यांचा मोहभंग झाला आणि ते विरोधी पक्षनेते बनले, मविआ चे सरकार स्थापन होण्या अगोदर ते अल्पकाळासाठी मुख्यमंत्री बनले, अजितदादांबरोबरचा पहाटेचा शपथविधी फारच गाजला होता. मात्र २०२२ मधे दिल्लीश्वरांच्या पाठिंब्याने त्यांनी आपली कलाकारी दाखवत ऐकनाथ शिंदे या ऊद्धव ठाकरे यांच्या शिलेदारालाच बंडखोरी करायला लावुन 'मविआ' चे सरकार पाडले. त्यावेळी फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील असे सर्वांनाच वाटत होते मात्र त्यांनीच मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे हे सरकार स्थापन करतील आणि मी सरकारचा भाग रहाणार नाही असे जाहीर केले मात्र दिल्लि वरून आदेश येताच ऊपमुख्यमंत्री म्हणून सरकार मधे सामील झाले. २०२३ मधे पून्हा एकदा त्यांनी आपली कलाकारी दाखवत अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातुन बाहेर काढले आणि थेट ऊपमुख्यमंत्री पदावर बसवले.गेल्या दहा वर्षांपासून राज्यातील भाजपचे सर्वेसर्वा म्हणून देवेंद्र फडणवीस यांचाच शब्द अंतिम मानला जातो, लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही याची खंत ठेवुन देवेंद्र फडणवीस यांनी रणनिती आखली आणि त्याचे फळ त्यांना भरभरून मिळाले. दिल्लीतील नेतृत्वाने देखील त्यांना सबका साथ, सबका विश्वास चा सल्ला दिला, त्यामुळे पंकजा मुंडे विधानपरिषदेवर गेल्या. कधी नव्हे एवढे यश भाजपने मिळवत तब्बल १३२ जागा जिंकल्या आपल्या पक्षाला जिंकुन दिल्याच मात्र आपले मित्र पक्ष असलेल्या शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देखील घवघवीत यश मिळवून दिले.

देवेंद्र फडणवीस हे संघाच्या मुशीतुन तयार झालेले सच्चे कार्यकर्ते आहेत, त्यांच्या काकी शोभाताई फडणवीस, वडील कै. गंगाधर फडणवीस यांच्या संस्कारातून ते घडले आहेत, प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि नंतर व्यक्ती ही मुल्ये मानणाऱ्या भाजपचे ते पाईक आहेत, पक्षाचा आदेश हा त्यांचासाठी सर्वतोपरी. भाजप आणि महायुतीला मिळालेल्या महायशाचे ते खरे शिल्पकार ठरले आहेत. आता मुख्यमंत्री पदासाठी त्यांचेच एकमेव नाव घेतले जात आहे आणि नैतिकदृष्ट्या तो त्यांचाच अधिकार आहे मात्र नियतीच्या मनात काय आहे हे काळच ठरवेल, भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी देखील त्यांच्या नावाची चर्चा आहे. भाजप, फडणवीसांबाबत, त्यांच्या कार्यपद्धतीबाबत कितीही मतभेद असले तरी पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता कसा असावा तर देवेंद्र फडणवीस यांच्या सारखा असावा. दिल्लीतील 'चाणक्य' यांच्या बरोबरीने देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातील 'ज्युनिअ' चाणक्य म्हणून ओळखले जातात.

**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## दुचाकीच्या पसंतीच्या नंबरा करीता नोंदणी सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, ठाणे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे येथे VAHAN या संगणक प्रणालीवर परिवहनेत्तर संवर्गातील दुचाकी वाहनांसाठी सध्या सुरु असलेली एम एच – ०४ एम जे मालिका संपल्यानंतर तात्काळ नवीन मालिका एम एच – ०४ एमके सुरु करण्यात येणार आहे. तरी आकर्षक व पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांकासाठी दि.२२ नोव्हेंबर २०२४ पासून अर्ज स्विकारुन पसंतीचे व आकर्षक क्रमांक विहीत शुल्क आकारुन आरक्षित करण्यात येतील, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे, रोहित काटकर यांनी कळविले आहे.

### स्पष्ट बहुमत..

मिळे स्पष्ट बहुमत
चित्र बनते सुस्पष्ट
राज्य हो स्थापीत
विनासायास कष्ट

घोडेबाजार विरला
अनिश्चितता रे नष्ट
एकहातीसत्ताधारी
सरले सगळे वितुष्ट

बंडखोरी शांतसारी
ते चिडीचूपअसंतुष्ट
सरकार डावा डोल
येणारं नाही आरिष्ट

धाकधूक ना मनात
नाही कसले वितुष्ट
निपुट बसतील सारे
असेना कुणीही रुष्ट

निर्णय क्षमता वृध्दी
सिंहासनी धष्ट पुष्ट
विनागतिरोध गाडी
धावू शकेलं उत्कृष्ट

अंकुश ना कुणाचा
डोके ना व्हावे भ्रष्ट
लयास ने लोकशाही
असले काही भ्रमिष्ट

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय...




**अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले.** महायुतीने तब्बल दोनशे छत्तीस जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे.

अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला या निवडणुकीत महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. महायुती कसाबसा सत्तेचा सोपान चढेल असा अंदाज होता निवडणूक पूर्व चाचणीत ही तेच दाखवण्यात आले होते मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले.

अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. काहीजण या निकालावर अजूनही विश्वास ठेवायला तयार नाही कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला ? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे.

या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटी नंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन केले. याउलट माहविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा वाटप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची एकजूट कोठेच दिसली नाही. महाविकास आघाडीचे नेते सत्ता आपल्यालाच मिळाली या थाटात एकमेकांशी भांडू लागले. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू झाली. महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली.

लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजनेअंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्या वेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश.

या निकालाने काँगेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. पक्षातील जुन्या बोल बच्चन नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

# थोडक्यात

## चुरशीच्या लढाईत रोहित पवारांची बाजी !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, कर्जत (अहिल्यानगर) :** मागील विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीचे जिल्ह्यामध्ये वर्चस्व होते. मात्र, या विधानसभा निवडणुकीमध्ये शरद पवार यांची राष्ट्रवादी जिल्ह्यामधून हद्दपार होण्याचा मार्गावर असतांना रोहित पवार यांच्या काठावरील विजयामुळे शरद पवार गटाला खाते उघडता आले. कर्जत-जामखेड विधानसभा मतदासंघात आ. रोहित पवार आणि आ. राम शिंदे यांच्यात अटीतटीची लढत झाली. शेवटच्या फेरीत आ. पवार यांनी १ हजार २४३ मतांनी विजय मिळवला. यात आ. पवार यांना १ लाख २७ हजार ६७६ तर आ. शिंदे यांना १ लाख २६ हजार ४३३ मते मिळाली.

निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील यांनी रात्री सव्वासात वाजता निकाल जाहीर केला. कर्जत- जामखेड विधानसभा मतदारसंघाकडे राज्यातील सर्वात लक्ष वेधले होते. याठिकाणी कोण बाजी मारणार याबाबत शेवटच्या फेरीपर्यंत उत्सुकता होती. प्रत्येक फेरीत चित्र बदलत होते. सुरुवातीला पहिल्या फेरीत पवार आघाडीवर होते. त्यानंतर शिंदे यांनी मुसंडी मारत आघाडी घेतली.पुढील काही फेर्यांत पुन्हा पवार यांनी आघाडी घेतली. त्यानंतर पुन्हा शिंदे यांनी आघाडी घेतली आणि शेवटच्या २६ व्या फेरीमध्ये रोहित पवार यांनी बाजी मारली. शेवटच्या बॉलवर सिक्सर मारून मॅच जिंकली असा हा निकाल लागला आहे. विधानसभा निवडणुकीची मतमोजणी कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालय येथील हॉलमध्ये झाली. मतमोजणीसाठी मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतमोजणी परिसरात असणारा कर्जत वालवडरोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. मतमोजणी पहिल्या फेरीत रोहित पवार यांनी २८८ मतांची आघाडी घेतली. मात्र दुसर्याच फेरीत शिंदे यांनी ६३४ मतांची आघाडी घेतली ही आघाडी तिसर्या फेरीत १५४६ अशी वाढली आणि सहा फेर्यांपर्यंत शिंदे आघाडीवर होते. जेव्हा जामखेड तालुक्याची मतमोजणी सातव्या फेरीमध्ये सुरू झाली, त्यावेळी शिंदे यांची आघाडी तोडून ६३८ मतांची पवारांना आघाडी मिळाली. त्यांची ही आघाडी तेराव्या फेरीपर्यंत होती. मात्र चौदाव्या फेरीमध्ये पुन्हा कर्जत तालुका सुरू झाला आणि शिंदे यांनी पवार यांची आघाडी मोडून १८४ मतांची आघाडी घेतली. यानंतर १९ व्या फेरीपर्यंत शिंदे आघाडीवर होते. विसाव्या फेरीमध्ये पवार यांनी शिंदे यांची आघाडी तोडून २८५ मतांची राशीन जिल्हा परिषद गटामध्ये आघाडी घेतली. २२ व्या फेरीत शिंदे यांनी पुन्हा आघाडी घेतली. त्यांनी ती २५ व्या फेरीपर्यंत टिकवली. मात्र शेवटच्या २६ व्या फेरीमध्ये पवार यांनी आघाडी घेत विजय मिळवला. मतमोजणीचा निकाल जाहीर झाला आणि रोहित पवार यांच्या विजयाची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील यांनी केल्यानंतर राम शिंदे यांनी फेर मतमोजणीची मागणी केली. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ती नाकारली.

अशाप्रकारे क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवणाऱ्या कर्जत - जामखेड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीच्या इतिहासामध्ये एवढ्या कमी मताच्या फरकाने निवडणूक जिंकण्याची ही पहिलीच घटना आहे. यावेळी प्रत्येक मताला किती महत्त्व आहे, हे सिद्ध झाले. ज्या गावांमध्ये आपल्या नेत्याला लीड मिळाले आहे, ते कार्यकर्ते उत्साहाने मिरवताना दिसून येत होते. मात्र,जसजसी मतमोजणी पुढे पुढे जात होती,तसा कोणालाही कोणताच अंदाज येत नव्हता. दोघांचेही समर्थक जल्लोष करत होते. अनेकवेळा कोण विजयी झालेले आहे हे देखील लक्षात येते नव्हते. शेवटच्या फेरीपर्यंत अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत पवार यांनी शिंदे यांच्यावर मात केली. राज्यात ही निवडणूक आगळीवेगळी ठरली आहे.

## ठाणे जिल्ह्यात उद्यापासून पशुगणनेस प्रारंभ

**दि.२४, ठाणे :** पशुगणनेला दि.२५ नोव्हेंबरपासून ठाणे जिल्ह्यात प्रारंभ होणार आहे. दि.२८ फेब्रवारी पर्यंत ही मोहीम चालणार आहे. तीन हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची नियुक्ती केली आहे. पशुगणनेमुळे पशुसंवर्धन विभागाला योजनांची अंमलबजावणी करणे, निधीची उपलब्धता करणे सोयीचे ठरणार आहे.

पशुसंवर्धन विभागाकडुन दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच हो मोहीम राबवली जाते. मागील पशुगणना २०१९ मध्ये झाली होती. वास्तविक २०१७ मध्ये पशुगणना होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्यासाठी दोन वर्षाचा विलंब झाला होता. यंदाची पशुगणना २५ नोव्हेंबरपासून सुरु केली जाणार आहे. त्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून तयारी केली जात आहे.पशुगणनेसाठी प्रगणकांची नेमणुक केली आहे. त्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे.

पशुधन पर्यवेक्षक पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांची या कामासाठी नियुक्ती केली आहे. या मेहीमेत गायवर्ग, म्हैसवर्ग, शेळी- मेंढी, अश्व, वराह यांची गणना केली जाणार आहे. पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते, शिवाय पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे. त्यानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे आपल्याकडील जनावरांची खरी माहिती पशुपालकांनी द्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशसंवर्धन उपआयुक्त डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांनी केले. ठाणे जिल्ह्यात ग्रामीण भागासाठी एकूण ७२ प्रगनक व १४ सुपरवायझर नेमण्यात आले तर शहरी भागासाठी ३८९ प्रगनक व ४७ पर्यवेक्षक नेमण्यात आलेले आहेत. प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त डॉ. प्रशांत कांबळे यांनी ठाणे जिल्ह्याचा आढावा घेऊन पशुगणनेच्या तयारी बद्दल मार्गदर्शन केले आहे.

## सदाशिव पेठेत भरदिवसा घरफोडी, दीड लाखांचे परदेशी चलन चोरीला

**दि.२४, पुणे :** भरदिवसा सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील अमेरिकन डॉलर चोरून नेल्याची घटना सदाशिव पेठेत घडली. चोरलेल्या अमेरिकन डॉलरचे मूल्य भारतीय चलनात एक लाख ५१ हजार ९८५ रुपये आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ज्येष्ठ महिला सदाशिव पेठेतील सिद्धी हाऊसिंग सोसायटीत राहायला आहेत. १८ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ महिला आणि त्यांचे पती बाराच्या सुमारास नातीला शाळेतून आणण्यासाठी सदनिका बंद करून बाहेर पडले. दुपारी एकच्या सुमारास ते नातीला घेऊन घरी परतले. तेव्हा सदनिकेचे कुलूप चोरट्यांनी तोडल्याचे लक्षात आले. चोरट्यांनी शयनगृहातील कपाटात ठेवलेले १८०० अमेरिकन डॉलर चोरून नेले. भरदिवसा घरफोडी झाल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे तपास करत आहेत.

# नांदेड दक्षिण मतदान घोषवाक्य स्पर्धेत आशिष कल्याणे यांचा प्रथम क्रमांक

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मुगट येथील दैनिक लोकमतचे वार्ताहार आशिष विजयराव कल्याणे यांचा ०८७ नांदेड दक्षिण वतीने मतदान जनजागृतीसाठी आयोजीत खुल्या घोषवाक्य, स्पर्धोत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. वेळोवेळी विविध खुल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व खुल्या स्पर्धांना अत्यंत भरघोस प्रतिसाद लाभला.

या सर्व स्पर्धेत एकूण नांदेड दक्षिणसह संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील ९ विधानसभा क्षेत्रातील १६६ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. त्यात आशिष विजयराव कल्याणे रा.मुगट,यांचा खुल्या घोषवाक्य




स्पर्धोत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. या स्पर्धेमुळे मतदान जनजागृती होण्यास भरीव मदत झाल्याचे निदर्शनास आले. या सर्व स्पर्धकांचा ०८७ नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने सन्मान करुन प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या प्रमाणपत्रांचा वितरण सोहळा तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात डॉ सचिन खल्लाळ-निवडणूक निर्णय अधिकारी ०८७ नांदेड दक्षिण तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड, प्रविण पांडे-तहसीलदार नांदेड, नितेशकुमार बोलोलु-नायब तहसीलदार निवडणूक, संजय नागमवाड, पेशकार राजकुमार कोटुरवार, स्वीप प्रमुख रुस्तुम आडे, स्वीप सदस्य राजेश कुलकर्णी व संजय भालके, डॉ घनश्याम येळणे, विजयकुमार चोथवे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.जी.कुलकर्णी यांनी केले तर आभार विजयकुमार चोथवे यांनी व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीप सदस्य बालासाहेब कच्छवे, कविता जोशी व सारिका आचमे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'दैं.अक्षराज' पत्रकार जयराम देमगुंडे यांना जीवे मारण्याची धमकी !

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२४, उदगीर (लातुर) :** उदगीर तालुक्यातील गुडसुर गावात अवैध दारू मोठ्या प्रमाणात विकली जाते. याच्यामुळे दोन महिन्यांपूर्वी दै.अक्षराज वर्तमान पत्रातून एक बातमी प्रकाशित करण्यात आली होती. पोलीसांच्या आशीर्वादाने गल्ली तेथे दारूचे दुकान या मथळ्याखाली बातमी प्रकाशित करण्यात आली होती. यामुळे या अवैध दारु दुकानदारांवर कारवाई करण्यात आली होती, म्हणून काल (दि.२४) रात्री ११ वाजता मतमोजणी झाल्यानंतर घोणसी मार्गे गुडसुरला जात असताना अवैध दारू विक्री करणारा सुर्यकांत दयानंद हामालपुरे यांनी त्यांची बुलेट गाडी ही अण्णाभाऊ साठे चौक गुडसुर येथे जयराम देमगुंडे येत असलेल्या कारपुढे बुलेट गाडी आडवी लावुन जीवे मारण्याची धमकी देत होता व तू कितीही बातम्या टाकल्यास तरी माझे काही वाकडे करू शकत नाही. कारण मी वाढवणा बु.पोलिस ठाण्यात दर महिन्याला हप्ते देत




असतो. त्यामुळे माझे ते काही करू शकत नाहीत. फक्त तुझ्या बातम्यामुळे माझ्या दुकानावर लातूरवरुन एल.सी बी. चे अधिकारी धाड टाकतात. त्यामुळे हा मस्तवान अवैध दारू विक्रेता मला शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देत असुन संबंधित बिट जमादाराला आर्थिक देवाण घेवाण करीत असल्यामुळे बिट जमादार हप्ता खाऊन शरमिंदा असल्यामुळे कार्यवाही करत नाही. मात्र वृत्तपत्राच्या बातमीची दखल घेऊन लातूर एल.सी.बी. पोलीस धाड टाकून गुन्हे दाखल करत आहेत, म्हणुन अवैध दारू विकणारा बिट जमादार यांच्या जिवावर सूर्यकांत हामालपूरे मी वार्ताहर जयराम देमगुंडे रा. गुडसूर मला शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देत असून ह्या सूर्यकांत हामालपूरे मुळे माझ्या जीवाचाला धोका आहे. काही जीवाचे बरे वाईट झाले, तर याची सर्वस्वी जवाबदारी बिट जमादार व वाढोणा पोलीस ठाण्याची राहील अशा गुंडाला पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे बळ मिळत आहे. याच्यावर तडीपारची कारवाई करावी व गावातील सर्व अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी अन्यथा मला व ग्रामस्थांना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल या प्रकरणात वरिष्ठांनी जातीने लक्ष घालुन त्वरीत अवैध दारू विक्री बंद करावी व धमकी देणाऱ्या सूर्यकांत हामालपूरे वर कार्यवाही करावी. अशी मागणी पत्रकार जयराम देमगुंडे यांनी केली आहे.

# आमदार विनोद निकोले यांची तलासरीत भव्य मिरवणूक : जनसागराचा उसळता उत्साह

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, पालघर (तलासरी) :** डहाणू विधानसभा मतदारसंघातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (लाल बावटा) आमदार विनोद निकोले यांनी २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळवल्यानंतर तलासरी येथे दि. २४ नोव्हेंबर रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. ही मिरवणूक दुपारी दीड वाजता तलासरी सुतारपाडा येथून सुरू होऊन तलासरी नाका, मुख्य बाजारपेठ, आणि जंगल कामगार सहकारी सोसायटीपर्यंत मोठ्या उत्साहात काढण्यात आली.

मिरवणुकीत लाल बावटे की जय या घोषणांनी परिसर दणाणून गेला. डीजेच्या तालावर मिरवणुकीला सुरुवात झाली, जिथे महिलांनी पारंपरिक तारपा नृत्य करून मिरवणुकीला रंगत आणली. या मिरवणुकीत सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या हातात लाल झेंडे होते, तर महिला वर्गाने उत्साहात नृत्य करून सामूहिक आनंदोत्सव साजरा केला. जंगल कामगार सहकारी सोसायटी येथे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष महेशभाई पटेल यांनी आमदार विनोद निकोले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी त्यांनी आमदारांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या कामांवर विश्वास असल्याचे सांगितले. या मिरवणुकीत विविध समाजघटकांनी सहभाग घेतला. मिरवणुकीचा उद्देश निवडणुकीतील विजय साजरा



करण्याबरोबरच जनतेच्या एकजुटीचे दर्शन घडवणे हा होता. लाल बावट्याच्या विजयात सर्व समाजघटकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे आमदारांनी यावेळी स्पष्ट केले. आमदार विनोद निकोले यांच्या या मिरवणुकीने तलासरीत सणासारखे वातावरण निर्माण केले होते. लाल बावट्याचा हा उत्सव जनतेच्या पाठिंब्याने आणि एकजुटीच्या शक्तीने पुढेही असाच दणक्यात साजरा होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. मिरवणुकीच्या मोठ्या गर्दीला लक्षात घेता चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणुकीत कुठलीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट व्यवस्था केली.

# अहिल्यानगरची जनता महायुतीच्या पाठीशी हे निकालाने सिद्ध !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, राहाता (अहिल्यानगर) :** अहिल्यानगरची जनता ही महायुतीच्याच पाठीशी आहे हे विधानसभेच्या निकालाने सिध्द करुन दाखविले आहे. निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीकडून फक्त खोटे नॅरेटिव्ह पसरविण्याचे काम झाले. मात्र सुज्ञ जनतेने त्यांना थारा दिला नाही. जाणत्या राजांनीही या जिल्ह्यात खोटे बोलून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.



त्यांनाही जनतेने घरात बसविले आहे तर भावी म्हणून मिरवून घेणार्यांना सुध्दा जनतेने आता माजी करुन टाकले असल्याचा टोला महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला. विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल लोणी बुद्रुक ग्रामस्थांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात ना. विखे पाटील बोलत होते. तत्पूर्वी त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. प्रवरानगर येथे जावून ना. विखे पाटील यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या स्मृतींना अभिवादन केले. सत्काराला उत्तर देताना ना. विखे पाटील यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर जोरदार टीकास्त्र सोडले. केवळ दिशाभूल करणारी वक्तव्ये करुन राज्यातील जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम लोकसभा निवडणुकीत यांनी केले. परंतु विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या सरकारमध्ये कुठेही घटना बदलली नाही आणि आरक्षणही रद्द केले नाही. अशा खोट्या नॅरेटिव्हला जनतेने या विधानसभा निवडणुकीत कुठेही थारा दिला नाही. त्यामुळेच महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला ऐतिहासिक असे पाठबळ देवून पुन्हा एकदा सरकार स्थापन करण्याची संधी दिल्याचे त्यांनी सांगितले.

महायुतीच्या योजनांना बदनाम करण्याचे काम तसेच समाजामध्ये जातीयवादा वरून सामाजिक मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला. या सर्वांनाच जनतेने मतदानातून चपराक दिली. या शिर्डी विधानसभा मतदारसंघातही जाणते राजे आले. खोटे आरोप करून, संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण शिर्डीच्या सुज्ञ जनतेने त्यांना कुठेही थारा दिला नाही,कारण वर्षानुवर्षे जिल्ह्यात एकमेकांमध्ये झुंजी लावण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या ह्या खोट्या भूलथापांना अता जनतेने टोलावले आहे. आता जिल्ह्यातच काय राज्यातही त्यांना फिरण्याची संधी राहिलेली नाही. त्यांनी आता घरात बसून आराम करावा. राज्यात अनेक भावी मुख्यमंत्री तयार झाले होते.

त्यामध्ये आपल्या जिल्ह्यातील एक होते, पण या भाविंना आता जनतेने माजी करुन टाकले आहे. दहशतीचा आरोप करून शिर्डीच्या पवित्र भूमीला आणि जनतेला अपमानित करण्याचे काम शेजारच्या नेत्यांनी केले. पण खरी दहशत कुठे होती हे उघड झाले. संगमनेरच्या दहशतीचे झाकण आता खऱ्या अर्थाने उघडले आहे. अमोल खताळ सारख्या सामान्य कार्यकर्त्याने त्यांची दहशत मोडून काढली असल्याचे सांगतानाच,पारनेरच्या बाबतीतही हेच घडले. केवळ विखे परिवाराची बदनामी करुन, राजकारण करु पाहणाऱ्यांना आता या जिल्ह्याने चांगलाच धडा शिकवला आहे. महायुतीचे दहा आमदार निवडून आल्यामुळे जिल्हा हा महायुतीच्या पाठीशीच आहे हे सिद्ध झाले आहे.

येणाऱ्या काळात जी जी आश्वासनं महायुती सरकारच्या वतीने देण्यात आली आहेत. त्याची पूर्तता करायची असून. शिर्डीच्या जनतेने दिलेल्या पाठिंब्यामुळे हा ऐतिहासिक विजय होवू शकला. लाडक्या बहिणींचे पाठबळ उभे राहील्याचे समाधान विखे पाटील यांनी व्यक्त केले. याप्रसंगी डॉ सुजय विखे पाटील यांचेही भाषण झाले.

# विधानसभा निकालानंतर 'माझी लाडकी बहीण' योजनेच्या पुढील हप्त्याची प्रतीक्षा

## १५०० की २१०० रुपये?

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४ डोंबिवली (ठाणे) :** राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांसाठी गेम चेंजर ठरली आहे. जुलै २०२४ मध्ये अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात या योजनेची घोषणा केली होती. त्यानंतर आतापर्यंत पात्र महिलांच्या खात्यात पाच हप्त्यांचे पैसे जमा झाले आहेत.

माञ आता डिसेंबरच्या हप्त्याची उत्सुकता सर्वसामान्य महिलांमध्ये दिसून येते. जुलै २०२४ मध्ये लागू झालेल्या या योजनेसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज




करण्याची मुदत होती. योजनेच्या माध्यमातून सुमारे २ कोटी ४० लाख महिला पात्र ठरल्या असून, आतापर्यंत २ लाख २० हजार महिलांच्या खात्यात हप्त्यांचे पैसे जमा झाले आहेत. जुलै आणि ऑगस्टचे हप्ते रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर, तर सप्टेंबर चा हप्ता काही काळाने वितरित करण्यात आला. ऑक्टोबर-नोव्हेंबरचे हप्ते दिवाळी बोनस म्हणून एकत्र दिले गेले.

ज्यामुळे पात्र महिलांच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा झाले. आचारसंहिता लागू झाल्याने विरोधकांनी योजनेबाबत शंका उपस्थित केली होती. माञ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नोव्हेंबरचे हप्ते ऑक्टोबरमध्येच वितरित करून महिलांना आश्वस्त केले. निवडणुकीच्या प्रचारादरम्यानही त्यांनी डिसेंबरचा हप्ता लवकर देण्याचे वचन दिले होते.

निवडणुकांमध्ये महिला मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान केल्यामुळे योजनेचा प्रभाव स्पष्ट दिसतो. सत्तेत पुनरागमन झाल्यास हप्त्याची रक्कम दीड हजारांवरून २१०० रुपयांपर्यंत वाढवण्याचेही वचन सरकारने दिले आहे. माञ, महिलांच्या खात्यात येणाऱ्या पुढील रकमेबाबत आता प्रश्न आहे. आधीच्या प्रमाणे १५०० रुपये मिळणार की वाढीव २१०० रुपये? सरकारकडून लवकरच याबाबत निर्णय होण्याची अपेक्षा महिलांकडून व्यक्त केली जात आहे.

# आमदार महेंद्र थोरवेच कर्जत-खालापूरकरांचे 'लाडके'

## कर्जत-खालापूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार थोरवे ५ हजार ७६१ मताधिक्याने विजयी

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.२३, कर्जत :** कर्जत विधानसभा मतदार संघात २९०० कोटी रूपयांचा आणलेला निधी... मतदार संघातील महिलांना 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' योजनेचा लाभ मिळावा, यासाठी घरोघरी जावून भरलेले अर्ज... कर्जत व खोपोली शहराच्या विकासाला दिलेले प्राधान्य... नियोजनबध्द प्रचार... यामुळे कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघातील जनतेने आमदार महेंद्र थोरवे यांना दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून दिले आहे. या विजयाने आमदार महेंद्र थोरवे हेच कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघातील जनतेचे 'लाडके' आहेत, यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदार संघात २० नोव्हेंबरला मतदान झाले, त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी झाली. या विधानसभा निवडणुकीत कर्जत-खालापूर १८९ मतदार संघात तिरंगी लढत पहावयास मिळाली. या मतदार संघात एकूण ३ लाख १८ हजार ७४२ मतदार असून त्यापैकी २ लाख ४० हजार १० मतदारांनी मतदान केले. या तिरंगी लढतीत महेंद्र थोरवे, सुधाकर घारे व नितीन सावंत यांच्यात लढत झाली.

या लढतीत पहिल्या फेरीपासून ते १७ व्या फेरीपर्यंत अपक्ष उमेदवार यांनी ९१५ मतांची आघाडी कायम ठेवली, त्यानंतर १८ व्या फेरीपासून २६ व्या फेरीपर्यंत महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांना खोपोली, खालापूरमधून आघाडी



मिळाली आणि ती शेवटपर्यंत टिकून राहिली. यामध्ये महेंद्र थोरवे यांना एकूण ९४ हजार ५११ मतदान झाले. तसेच अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांना एकूण ८८ हजार ७५० मतदान झाले तसेच नितीन सावंत यांना एकूण मतदान ४८ हजार ७३६ झाले.

महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांना ५ हजार ७६१ मताधिक्य मिळाले व त्यांचा विजय झाला. यावेळी नोटाला १ हजार ९४६ मते मिळाली. या मतदार संघात अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. खालापूर व खोपोलीमधील कार्यकर्त्यांनी यशस्वी मेहनत घेवून आमदार महेंद्र थोरवे यांना विजय मिळवून दिला.

# आदिवासी एकता परिषदेचे ६ वा आदिवासी सांस्कृतिक जिल्हा संमेलन उत्साहात

## *तरुणांनी संस्कृती, जल, जंगल जमीन टिकवण्यासाठी जवाबदारी घ्या - डॉ.सुनील पऱ्हाड*

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, पालघर :** आदिवासी संस्कृतीवर वेगवगेळी आक्रमणे येऊ पाहत आहेत. तरी आपली संस्कृती, जल, जंगल जमीन टिकवण्यासाठी तरुणांनी जवाबदारी घेण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन आदिवासी समन्वय मंच भारतचे राष्ट्रीय अध्यक्ष, आदिवासी एकता परिषदेचे सचिव डॉ. सुनील पऱ्हाड यांनी सफाळे येथे केले. अन्यथा आपण आणि आपला गाव शिल्लक राहणार नाही. असेही ते म्हणाले. आदिवासी एकता परिषदेकडून ठाकूरपाडा कपासे येथे ६ वे आदिवासी सांस्कृतिक जिल्हा संमेलन आणि आदिवासी क्रांतीविरांची संयुक्त जयंतीसाठी

मोठ्या उत्साहात पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आसाम, राजस्थान तसेच जळगाव, धुळे, नंदुरबार आणि पालघर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून मोठ्या संख्येने मान्यवर तसेच कलाकार आणि मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. भव्य तारपा प्रतिकृती आणि आदिवासी देवदेवता संस्कृती दर्शन हे विशेष आकर्षण




होते.शनिवारी दुपार पासून ते रात्री २ वाजेपर्यंत भरगच्च कार्यक्रम करण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने लोक उपस्थित होते. आसाम येथील तरुणांनी आदिवासी संस्कृती दर्शन, बोलीभाषा आणि नृत्य यांचे सादरीकरण वैशिष्ट्य ठरले.

सफाळे पूर्व गेरूच्या ओहळावरून रॅलीला सुरुवात करून कार्यक्रमाला शुभारंभ केला. दरम्यान माकणे येथून बिरसा मुंडा चौकाला अभिवादन करण्यात आले. यानंतर रॅलीचे कार्यक्रमात रूपांतर करण्यात आले. जागतिक कीर्तीचे तारपा वादक भिकल्या धिंडा, घान्गली वादक सोनू म्हसे यांनी आपली कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लावणी सम्राट आर्यन गटाचे युट्युब कलाकार नितेश बुंधे,भरत गवळी, महेश बेलकर, अजय शिंदे, दिनेश भोईर, सोनू म्हसे, धर्मा बेलकर, रुपेश कडव, राजेश मसमारे यांनी आपल्या कला सादर करून तरुणांना खिळवून ठेवले. यावेळी चिमुकल्यानी आदिवासी संस्कृतीवर आधारित परंपरीक नृत्य, नाटक, सादर केली.

स्वागत अध्यक्ष प्रकाश पांडुरंग कोंब सरपंच ग्रामपंचायत कपासे, डॉ.सुनील पऱ्हाड - राष्ट्रीय अध्यक्ष, आदिवासी समन्वय मंच इंडिया, प्रेमिला बेन वसावा (गुजरात) - महिला सेल अध्यक्षा, राजू पांढरा केंद्रीय अध्यक्ष मंडळ सदस्य, किर्ती वरठा- केंद्रीय अध्यक्ष मंडळ सदस्य, स्टेलीन इंगटी (आसाम) अध्यक्ष मंडळ सदस्य, विलास बेलकर, बाळकृष्ण धोडी, प्रदीप ढाक, उमेश ढाक, चेतन उराडे, रान उराडे यांनी

मार्गदर्शन केले. प्रदीप ढाक यांना पालघर जिल्हा सचिव पद व पूर्णिमा देवराम परेड यांना पालघर जिल्हा सहसचिव पदाची जवाबदारी देण्यात आली.

संदीप आंबात, तन्वी वरठा यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी गजानन पागी, गीता पागी, नितीन बोंबाडे, अरविंद बेंडगा,सुरेखा पटेल, मीना वावरे, धनेश सुतार, राजेश ढाक, वंदना जाधव, निलेश वरठा, हरिश्चंद्र धोडी, प्रविण शेलका, विजय खेवरा, दिलेश भोईर, विकास शेलका, प्रतिभा ढाक, राकेश खानझोडे, कैलास तांडेल, विकास नडगे, गणेश बोंबाडे, सुनील बोंबाडे, रविंद्र दळवी, अनिल बरड,विकास दुमाडा, रतन तुंबडा,रेखा बुजड, रत्नेश म्हसकर, मिलिंद वाडु, सचिन मालकरी, भरत मालकरी, तुकाराम पटेल, सुवर्णा रावते, समीर वरठा, संदीप लहांगे, जगन धोडी, कैलास चौरे, सुरेश भोईर, पूर्णा परेड, विशाल गोलीम, चंदन ढाक यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# थोडक्यात

## गंगाखेड विधानसभेत आ.डॉ.रत्नाकर गुट्टे विजयी; समर्थकांचा जल्लोष



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२४, पालम (परभणी) :** गंगाखेड विधानसभा मतदार संघात महायुती पुरस्कृत रासपाचे विद्यमान आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी महाविकास आघाडीच्या शिवसेना उबाठाचे विशाल कदम यांचा पराभव करत दणदणीत विजय संपादन केला, दुसऱ्यानंदा आमदारकी मिळाल्याने समर्थकांनी जल्लोष साजरा केला. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या गंगाखेड विधानसभा निवडणुकीत महायुती पुरस्कृत रासपाचे विद्यमान आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांना १३ लाख ९ हजार ६८१ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीतील शिवसेना उबाठाचे विशाल कदम यांना ११ लाख ३ हजार ९६४ मते मिळाली. यात महायुती पुरस्कृत रासपाचे उमेदवार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी २५ हजार ७१७ मतांनी प्रतिस्पर्धी उमेदवार विशाल कदम यांचा पराभव केला. तर वंचित बहुजन आघाडीचे सिताराम घनदाट मामा यांना ४२ हजार ६३० मते मिळाल्याने तिसऱ्या क्रमांकावर राहिले. सुरुवातीच्या काही फेरीत महाविकास आघाडीचे विशाल कदम आघाडीवर असतांना रासपाचे आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांना आघाडी मिळताच त्यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत १२ वाजेच्या दरम्यांनच विजयी रॅली काढली. यादरम्यान गुट्टे यांना मिळालेली आघाडी मधेच कमी होऊन पुन्हा विशाल कदम यांना आघाडी मिळाल्याने कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली, एकवीसाव्या फेरीपासून विशाल कदम यांची आघाडी मोडत डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी मिळविलेली आघाडी शेवट पर्यंत कायम ठेवत २५ हजार ७१७ मतांनी विजय संपादन केला. यावेळी गंगाखेड विधानसभेत विविध ठिकाणी आ.डॉ.रत्नाकर गुट्टे मित्र मंडळ व रासपा च्या कार्यकर्त्यांनी, समर्थकांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

## आमदार सुहास आण्णा विजयी; पिंप्राळे गावात विजयाचा जल्लोष साजरा...

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२३, नांदगाव (नाशिक) :** नांदगाव विधानसभा मतदारसंघामध्ये आमदार सुहास कांदे यांनी दुसऱ्यांदा बाजी मारली. तर माजी खासदार समीर भुजबळ यांना पराभव स्वीकारावा लागला. सुहास कांदे यांच्यासमोर समीर भुजबळ यांच्यासह उ.बा.ठा गटाचे गणेश धात्रक, रोहन बोरसे



यांनी अपक्ष उमेदवारी करत आव्हान उभे केले होते. माञ नांदगावच्या मतदारांनी आमदार सुहास कांदे यांच्या पारड्यामध्ये भरभरून मतदान टाकत सुहास अण्णा कांदे यांच्या बाजूने कौल दिला. ९० हजार ची विजयी आघाडी घेत, नांदगाव मतदार संघात एकुण २५ फेरीच्या माध्यमातून मतमोजणी पार पडली. पहिल्या फेरीपासून, सुहास कांदे यांनी आघाडी घेतली होती. तर शेवटच्या फेरीपर्यंत सुहास कांदे यांनी आपली आघाडी कायम राखत ते विजयी झाले. यावेळी मतदार संघातील कार्यकर्त्यांसह पिंप्राळे येथील कार्यकर्त्यांनी आमदार निवासस्थानी जल्लोष साजरा करत केला तदनंतर पिंप्राळे गावात-गावातील महापुरुषांना पुष्पहार अर्पण करत फटाक्याची आताषबाजी करत जल्लोष साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांनी हा विकासाचा विजय आहे. आमच्या गावासह मतदार संघात अण्णासाहेबांनी भरपूर कामे केले आहेत. त्याचीच पावती आहे. अशा भावना यावेळी उपस्थितीतांनी व्यक्त केल्या. यावेळी काळूभाऊ शिंदे, बाळकृष्णा बिन्नर वकील, भगवान सातपुते, खंडू मामा कोळेकर, लहानु गोटे, नामदेव तांबे, महादू उशिरे, छगन सदगीर, बन्सी सदगीर, लक्ष्मण कोळेकर यांच्यासह पिंप्राळे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाणे जिल्ह्यात आजपासून पशुगणनेस प्रारंभ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, ठाणे :** पशुगणनेला सोमवार, दिनांक २५ नोव्हेंबरपासून ठाणे जिल्ह्यात प्रारंभ होणार आहे. दि. २८ फेब्रवारी पर्यंत ही मोहीम चालणार आहे. ३ हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची नियुक्ती केली आहे. पशुगणनेमुळे पशुसंवर्धन विभागाला योजनांची अंमलबजावणी करणे, निधीची उपलब्धता करणे सोयीचे ठरणार आहे. पशुसंवर्धन विभागाकडुन दर ५ वर्षांनी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच हो मोहीम राबवली जाते. मागील पशुगणना २०१९ मध्ये झाली होती. वास्तविक २०१७ मध्ये पशुगणना होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्यासाठी दोन वर्षाचा विलंब झाला होता. यंदाची पशुगणना २५ नोव्हेंबरपासून सुरु केली जाणार आहे. त्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून तयारी केली जात आहे.पशुगणनेसाठी प्रगणकांची नेमणुक केली आहे. त्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे. पशुधन पर्यवेक्षक पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांची या कामासाठी नियुक्ती केली आहे. या मोहिमेत गायवर्ग, म्हैसवर्ग, शेळी- मेंढी, अश्व, वराह यांची गणना केली जाणार आहे. पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. केंद्रीय पशुसंवर्धन विभागाच्या सॉफ़्टवेअरवर पशुधनाची माहिती भरावी लागणार आहे. प्रगणकांना मानधन आणि मोबाईल वापराचा वेगळा मोबदला दिला जाणार आहे अशी माहिती पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आली आहे.

# नुतन आमदार अभिजीत पाटील यांचे करकंबवासियांनी केले जल्लोषात स्वागत

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेल्या माढा विधानसभा मतदारसंघात कोण बाजी मारणार याची सर्वत्र चर्चा सुरु होती. याठिकाणी प्रस्थापितांना जबरदस्त फाईट देत महाविकास आघाडीकडून निवडणूक रिंगणात असलेले राष्ट्रवादी (श.प) गटाचे उमेदवार धपका किंग अभिजीत पाटील यांनी अपक्ष उमेदवार रणजीतसिंह शिंदे यांचा पराभव करुन इतिहास रचला असून सर्वसामान्य शेतकरी पुत्र अभिजीत पाटील विधानसभेत गेल्याने माढा मतदारसंघातील विठ्ठल परिवारातील पाटील समर्थकांनी मोठा जल्लोष केला. आज मुंबई या ठिकाणी जात असताना मतदारसंघातील करकंब या ठिकाणी कार्यकर्त्यांचे आग्रहास्तव नुतन आमदार पाटील यांनी उपस्थिती दर्शवित सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानुन हा विजय माझ्या पाठीशी खंबीर राहिलेल्या सर्वसामान्य जनतेचा असुन भविष्यात या मतदारसंघातील सर्व पायाभूत सुविधा सोडविण्यासाठी प्राधान्य देणार




असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी करकंबवासियांचे वतीने घनश्याम (नाना) शिंगणे यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

सोलापूर जिल्ह्यात माढा मतदारसंघातील लढत ही अत्यंत अटीतटीची मानली जात होती. कारण माढ्यात तिरंगी लढत होती. यामध्ये माढ्याचे विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजित शिंदे निवडणूक लढवत होते. तर त्यांच्या विरोधात शरद पवार गटाचे अभिजीत पाटील तर महायुतीकडून अजित पवार गटाच्या मिनल साठे निवडणूक लढवत होत्या. या माढा विधानसभा मतदारसंघात माढा तालुक्यातील ७८, पंढरपूर तालुक्यातील ४२ तर माळशिरस तालुक्यातील १४ गावे आहेत.

याठिकाणी अभिजीत पाटील यांच्यासाठी शरद पवार यांच्यासह दिग्गज नेत्यांनी सभा घेतल्या होत्या. त्याचा मोठा फायदा अभिजीत पाटील यांना झाला. शेतकरी पुत्र आणि सर्वसामान्य जनतेसाठी सतत कार्य करणारे नेतृत्व म्हणून अभिजीत पाटील हे पुढे येत आहेत. निवडणूकीत मतदारसंघातील मतदारांनी मोठे मताधिक्य पाटील यांना दिले यामध्ये करकंबवासियांचेही योगदान असुन हक्काचा माणुस विधानसभेत गेल्याने या ठिकाणी उपस्थित नागरिकांमध्ये मोठा उत्साह होता. यावेळी दिलीप (नाना) पुरवत माजी सरपंच, एड.एन.डी. शिंदे, दिगंबर घाटुळे, विठ्ठल व्यवहारे, लक्ष्मण तात्या नलावडे, अशोक शिंगटे, अनिल धोत्रे, संतोष धोत्रे, सुनील झिरपे, अमोल शेळके, भारत तावरे, पोपट बापू हेगडकर, पाटील आणि विठ्ठल परिवारातील पाटील समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.